# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

क्रमांक:कक्ष-१८/प्रक्र.२१३(०५-०६)/२२१/०६-०७,
नागपूर ४४० ००१, दिनांक १९.५.२००६.

**प्रति,**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) सर्व**
**वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) सर्व**

**विषय:- वनवणव्याबाबत नियमावली (Protocol on forest fires)**
संदर्भ:- पर्यावरण आणि वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक ९.५.२००६ चे पत्र.

विषयांकित प्रकरणी प्राप्त झालेल्या संदर्भाधीन पत्राची प्रत यासोबत, माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीस पाठविण्यात येत आहे. त्यात नमुद सुचनेनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात येत आहेत.

१. वनवणव्यात ५०० हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र बाधित झाल्यास आणि राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य क्षेत्रात वनवणव्याची कोणतीही घटना घडल्यास त्याबाबतचा अहवाल, करण्यात आलेल्या कार्यवाहीसह, सरळरित्या केंद्र शासनास सादर करून प्रत या कार्यालयास पृष्ठांकित करण्यात यावी.

२. वनवणव्याबाबत केंद्रशासनाने विहित केलेल्या प्रपत्रातील मासिक अहवाल, पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत, या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून राज्याचा संकलित अहवाल केंद्रशासनास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल. विहित मुदतीत प्राप्त न झालेल्या वृत्तांची माहिती संकलित अहवालातून वगळण्यात येईल.

असे मासिक अहवाल केवळ वनवणवा हंगामाच्या कालावधीकरिता सादर करावेत अशा जरी केंद्रशासनाच्या सूचना आहेत तरी देखील प्रत्येक महिन्याकरिता असे अहवाल नियमितपणे सादर करण्यात यावेत.

विहित प्रपत्रातील जानेवारी २००६ ते एप्रिल २००६ पर्यंतच्या कालावधीचे मासिक अहवाल तात्काळ सादर करून मे २००६ पासूनचे अहवाल विहित मुदतीत सादर करावेत.

यापूर्वी वनवणव्याच्या माहितीबाबत विहित करण्यात आलेले मासिक/पंधरवाडी अहवालाचे प्रपत्रे रद्द समजण्यात यावीत. यापुढे केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रपत्रातच अहवाल पाठविण्यात यावेत.

३. केंद्रशासनाकडील संदर्भाधीन पत्रातील मुद्दा क्रमांक ३ व ४ बाबत आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाहीचे निर्देश आपल्या अधिनस्त वन विभागांना देण्यात येवून तसे या कार्यालयास अवगत करावे.

४. दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या सप्ताहात FIRE WEEK आयोजित करण्याचे निर्देश या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र.११०/२१४२, दिनांक ११.१.२००२ अन्वये देण्यात आलेले आहेत. तसेच हा सप्ताह आयोजित करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूची समनस्ती पत्र क्रमांक २१८९, दिनांक १९.१.२००२ अन्वये कळविण्यात आलेली आहे. मात्र, याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे अहवाल आपणाकडून प्राप्त झालेले नाहीत. तरी सन २००६ मध्ये अशाप्रकारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर सादर करण्यास विनंती आहे.

**सहपत्रः-वरीलप्रमाणे.**

**स्वाक्षरी/-**
**मुख्य वनसंरक्षक (संरक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर.**

**प्रतिलिपीः-**

१) प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना संदर्भाधिन पत्राच्या सहपत्रासह माहितीकरिता सादर.

२) व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लिमिटेड, नागपूर यांना संदर्भाधिन पत्राच्या प्रतीसह माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीस सादर.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा., नागपूर यांना संदर्भाधिन पत्राच्या प्रतीसह माहितीकरिता सादर.